ePaper
‘लाडक्या बहिणींना लवकरच 2100 रुपये’: एकनाथ शिंदे
वर्ष - 8 । अंक - 242 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज ™

## आतील पानांत
- अखेर पाकिस्तानचा विजय झाला!
- आयपीएल’मध्ये चेंडूला ‘लाळे’ची लकाकी
- हल्ल्यांत शेकडो लोकांचा मृत्यू
- कर्नाटकात हनी ट्रॅपचा मुद्दा तापला

www.mahaenews.com | शनिवार, दि. 22 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### परब यांच्या मुद्द्याचे बूमरँग, जाता जाता राऊत, अंधारे यांनाही फटकारले !

# जखमी वाघीण : शिकारी झाले घायाळ!

## भाजपाच्या चित्रा वाघ यांनी विरोधकांना धू SS धू SS धुतले !

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**विधान परिषदेमध्ये ‘उबाठा’ गटाचे आमदार अनिल परब यांनी भाजपाच्या चित्रा वाघ यांना डिवचले आणि वैयक्तिक आरोप होत असल्याचे लक्षात येताच चित्रा वाघ यांनी आपले रौद्ररूप धारण करत अनिल परब यांच्यासह त्यांच्यावर टीका करणाऱ्या सर्वांनाच धू SS धू SS धुतले. आज दुसऱ्या दिवशी पत्रकार परिषद घेऊन त्यांनी पुन्हा अनिल परब, संजय राऊत आणि सुषमा अंधारे या उद्धवसेनेच्या शिलेदारांचा खरपूस समाचार घेतला.**



### आम्हाला हलक्यात घेऊ नका...

सभागृहामध्ये विषय चालला होता दिशा सालियनच्या मृत्यूचा ! त्यावर प्रश्न विचारताना उबाठा गटाचे अनिल परब यांनी जयकुमार गोरे आणि संजय राठोड यांच्यावर असलेल्या आरोपांबाबत जोरदार टीका केली. अनिल परब यांना सडेतोड उत्तर देताना चित्रा वाघ यांनी अक्षरशः रणरागिणीच्या थाटात त्यांना सुनावले. ज्याची जशी लायकी आहे तसाच तो विचार करतो, असे म्हणत त्यांनी लायकी काढली.

### ...त्यावेळी महिलांच्या चरित्रावर शिंतोडे !

त्यांनी आरोप केला की एखाद्या महिलेबाबत काही आरोप करता येत नसतील त्यावेळी सगळेजण त्या महिलेच्या चरित्रावर शिंतोडे उडवायला रिकामे असतात. मी गेले तीन दशके हे सहन करत आहे. काही सुचले नाही, की बोला चित्रा वाघ यांच्या नवऱ्यावर, नाही तर सं ज य राठोड विरुद्ध मी आवाज उठवला होता त्यावर !



### याद राखा, पुन्हा असे बोललात तर...

चित्रा वाघ यांचा रौद्रवतार बघून आधी सभागृह आणि नंतर पत्रकार परिषदेत सर्वजण अवाक् झाले. महिलांच्या चारित्र्यावर बोललात तर याद राखा माझ्याशी आणि माझ्या लाखो-भगिनींशी गाठ आहे, असा इशाराच त्यांनी दिला.

### छप्पन जण पायाला बांधून फिरते !

अनिल परब यांच्यासारखे ५६ जण पायाला बांधून फिरते, या त्यांच्या उद्गारावर सुषमा अंधारे यांनी टीका केली होती. पण नंतर चित्रा वाघ यांनी त्यांचेही तोंड बंद केले.

### वाचाळ बाईंबद्दल काय बोलणार?

चित्रा वाघ यांची पत्रकार परिषद झाल्यानंतर सुषमा अंधारे यांच्याशी पत्रकारांनी संवाद साधला, त्यावेळी त्या म्हणाल्या, की या वाचाळबाईंच्या तोंडाला कोण लागणार ? सभागृहाची किमान प्रतिष्ठा राखण्याचे भान सुद्धा या बाईंना नव्हते. पण, किमान माझ्या आरोपातील निम्मा भाग तरी त्यांनी मान्य केला. त्या ‘मातोश्री’ वर गेल्या होत्या हे तरी मान्य केले, हे लक्षात घ्या. त्यांच्या या बडबडीचे दूरगामी परिणाम उमटणार आहेत,असा इशाराही सुषमा अंधारे यांनी दिला.

### उद्धवजींनी, बोलावले म्हणून गेले !

‘उबाठा’च्या नेत्या सुषमा अंधारे यांनी चित्रा वाघ यांच्यावर टीका करताना टोमणा मारला होता, की ‘मला शिवसेनेत घ्या’ म्हणून ‘मातोश्री’ वर लोटांगण का घालत गेलात ? त्यावर बोलताना चित्रा वाघ यांनी गौप्यस्फोट केला. त्या म्हणाल्या, की मला मिलिंद नार्वेकर यांच्यामार्फत उद्धव ठाकरे यांचा निरोप आला आणि तुमच्या सारख्या महिला माझ्या शिवसेनेत हव्यात, असे ते म्हणाले. मला जायचे नव्हते, पण केवळ उद्धवसाहेबांचा मान ठेवायचा म्हणून मी त्यांना भेटायला गेले. अशा या सटरफटर बाईच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका, असा सल्लाही त्यांनी दिला.

## जीवनसाधना गौरव'साठी निकष निश्चितीचा ठराव

# विद्यापीठात मध्यवर्ती स्वयंपाकघर करा!

## आंबेकर यांनी मांडला विद्यापीठात स्वतंत्र विभाग सुरू करण्याचा ठराव

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व भोजनगृहांत एकाच दर्जाचे भोजन उपलब्ध होण्यासाठी मध्यवर्ती स्वयंपाकघर सुरू करण्याची मागणी विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी केली आहे. तसा ठराव मांडण्यात आला आहे. त्याचबरोबर विद्यापीठातील वसतिगृहात गांजा सापडण्याच्या प्रकरणानंतर अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्याचीही मागणी अधिसभा सदस्यांनी केली आहे.**




विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा २२ मार्च रोजी होत आहे. या अधिसभेची कार्यक्रमपत्रिका अंतिम करण्यात आली आहे. त्यात अधिसभा सदस्यांनी विविध विषयांवर ठराव मांडले आहेत. गेल्या काही काळात विद्यापीठातील वसतिगृहांत उंदीर, ढेकणांच्या प्रादुर्भावाचा विषय गाजला होता. तसेच, भोजनात अळी, झुरळे सापडण्याचेही प्रकार समोर आले आहेत. अशाच एका प्रकारानंतर विद्यार्थी संघटनेने एक भोजनगृह बंद पाडले होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठात आता मध्यवर्ती स्वयंपाकघर सुरू करण्याचा ठराव अधिसभा सदस्य प्रसेनजित फडणवीस यांनी मांडला आहे.तसेच, विद्यापीठाच्या वसतिगृहात गांजा सापडल्याची प्रकरणे उघडकीस आली होती. त्यामुळे अमली पदार्थ सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जागृती विद्यार्थ्यांमध्ये करण्यासाठी, असे प्रकार विद्यापीठात घडू नयेत यासाठी अधिसभा सदस्य डॉ. अपर्णा लळिंगकर यांनी विद्यापीठात कार्यशाळा आयोजित करण्याचा ठराव मांडला आहे. विद्यापीठातील प्लेसमेंट सेल आणि करिअर समुपदेशन कक्षासाठी पूर्ण वेळ अधिकारी देण्याच्या मागणीचा ठराव अधिसभा सदस्य राहुल पाखरे यांनी मांडला आहे. विद्यापीठातील अध्यासनांच्या कामकाजाचा आढावा प्रत्येक अधिसभेपुढे नियमितपणे ठेवण्याचा ठराव जयंत काकतकर यांनी मांडला आहे. विद्यापीठाने जगातील गरजू देशांमध्ये ऑफशोअर कॅम्पस सुरू करावेत, त्यासाठी विद्यापीठात स्वतंत्र विभाग सुरू करण्याचा ठराव विनायक आंबेकर यांनी मांडला आहे. तर, विद्यापीठातर्फे नेमल्या जाणाऱ्या विविध समित्यांमध्ये सदस्य समावेशाबाबतचे, एका सदस्याने एका वर्षात किती समित्यांवर काम करावे, या संदर्भात स्पष्ट निकष ठेवण्याची मागणी डॉ. सुनील लोखंडे यांनी केली आहे.विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी विद्यापीठाकडून जीवनसाधना गौरव पुरस्कार देण्यात येतात. मात्र, यंदा हे पुरस्कार घाऊक स्वरुपात देण्यात आल्याने पुरस्कार बंद करण्याची मागणी करण्यात आली होती. या अनुषंगाने जीवनसाधना गौरव पुरस्कार देण्यासाठी निवड समिती नियुक्त करून समितीने निवडलेल्या व्यक्तींचाच विचार पुरस्कारासाठी करण्याचा ठराव डॉ. भागुजी निगळे यांनी, तर बाळासाहेब सागडे यांनी जीवनसाधना गौरव पुरस्कारासाठी काही निकष निश्चित करण्याचा ठराव मांडला आहे.विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा २२ मार्च रोजी होत आहे. या अधिसभेची कार्यक्रमपत्रिका अंतिम करण्यात आली आहे. त्यात अधिसभा सदस्यांनी विविध विषयांवर ठराव मांडले आहेत.

### स्वयंपाकघर सुरू करण्याचा ठराव

गेल्या काही काळात विद्यापीठातील वसतिगृहांत उंदीर, ढेकणांच्या प्रादुर्भावाचा विषय गाजला होता. अशाच एका प्रकारानंतर विद्यार्थी संघटनेने एक भोजनगृह बंद पाडले होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठात आता मध्यवर्ती स्वयंपाकघर सुरू करण्याचा ठराव अधिसभा सदस्य प्रसेनजित फडणवीस यांनी मांडला आहे.तसेच, विद्यापीठाच्या वसतिगृहात गांजा सापडल्याची प्रकरणे उघडकीस आली होती.

---

## कृत्रिम बुध्दीमत्तेमुळे सर्वच क्षेत्रात मोठे बदल !

# कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर वाढला तरी शिक्षकांना महत्व असणारच

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कृत्रिम बुध्दीमत्ते मुळे सर्वच क्षेत्रात मोठे बदल होत आहे . कृत्रिम बुध्दीमत्तेचा वावर वाढत असला तरी शिक्षकांचे महत्व असणारच असल्याचे राज्य प्राचार्य महासंघाचे माजी अध्यक्ष तथा शिरुर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव नंदकुमार निकम म्हणाले . शिरुर शिक्षण प्रसारक मंडळाच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त विद्याधाम प्रशालेचा सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .**




शिरुर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनिल बोरा , महाविद्यालयीन नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रसिध्द उद्योगपती प्रकाश रसिकलाल धारीवाल , शिरुर शिक्षण मंडळाचे चंदुलाल चोरडिया , मोहनलाल गादिया ,प्रकाश बोरा , शिरीष बरमेचा ,धरमचंद फुलफगर , शिरीष गादिया , राजेंद्र भटेवरा , राजेंद्र दुगड , कुमारपालजी बोरा , प्रकाश बाफना व संस्थेचे सचिव नंदकुमार निकम , प्राचार्य डॉ .के . सी . मोहिते , ॲड .सुभाष पवार ,प्रशासकिय आधिकारी देशपांडे आदी यावेळी उपस्थित होते . नंदकुमार निकम यावेळी म्हणाले की, शिरुर तालुक्यात माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था व्हावी म्हणून शिरुर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करण्यात आली . ६ फेबृवारी १९४६ या संस्थेची स्थापना झाली . १९४६ ला ७५ विद्यार्थी संख्या व ४ शिक्षक होते . आज संस्थेचा ११ शाखातून २० हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून ६९२ शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहे.सन १९६७ ला संस्थेने महाविद्यालय सुरु केले . शिक्षण हे सकारात्मक दृष्टीकोन ठेवून द्यावे लागते व शिक्षकांना लवचिक राहावे लागते .कृत्रिम बुध्दीमत्ते मुळे सर्वच क्षेत्रात मोठे बदल होत आहे . कृत्रिम बुध्दीमत्तेचा वावर वाढत असला तरी शिक्षकांना महत्व असणार आहे . आगामी काळात शिक्षकांना आमूलाग बदल करावे लागणार असून नवीन तंत्रज्ञान स्वीकारुन नवीन बदल स्वीकारावे लागणार आहेत .

### शिक्षकांना सन्मानित करण्याचा उपक्रम

संस्थेने दैंनदिन कामकाजात ई प्रशासन सुरु केले आहे .नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षकांना स्वंत :हाला सामावून घेता आले पाहिजे . शिरुर शिक्षण प्रसारक मंडळ नेहमीच विविध क्षेत्रात अग्रगण्य राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .विविध क्षेत्रात मिळविलेल्या यशाचा मागोवा घेवून या शाळांना व शिक्षकांना सन्मानित करण्याचा उपक्रम कौतुकास्पद आहे .

## चालकांचे मानसिक आरोग्य, वर्तनातील बदल ओळखा

# आयटी सिटीमध्ये पोलिसांचा 'अलर्ट मोड'!

## पोलिसांकडून सर्व वाहतूक कंपन्यांना सूचना

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी येथे बुधवारी घडलेल्या आगीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर आयटी सिटीमध्ये पोलिसांनी अलर्ट मोड घेतला आहे. हिंजवडी पोलिस ठाण्याने हिंजवडी परिसरातील कंपन्यांना वाहतूक सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधींना बोलावून बैठक घेतली. चालकाचे मानसिक आरोग्य संभाळा, चालकाच्या वर्तनातील बदल ओळखायला शिका, आगीची किंवा इतर अपघाताची घटना घडल्यास काय खबरदारी बाळगावी याचे प्रशिक्षण द्यावे, अशा प्रकारच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या.**



हिंजवडी येथे बुधवारी (१९ मार्च) एका कंपनीच्या टेम्पो ट्रॅव्हलर वाहनाला आग लागून चार जणांचा होरपळून जागीच मृत्यू झाला. तर, सहा जण गंभिर जखमी झाले. वाहनातील शॉर्ट सर्किटमुळे हा अपघात घडला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला होता. मात्र, पोलिसांनी केलेल्या तपासात वाहनावरील चालकानेच जुन्या रागातून हा प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. हिंजवडी परिसरात शेकडो आयटी कंपन्या आहेत. या कंपन्यांमध्ये हजारो कर्मचारी काम करतात. तीन शिफ्टमध्ये या कंपन्यांचे काम चालते. त्यामुळे कर्मचाऱ्यांना प्रवासासाठी वाहतूक कंपन्यांकडून किंवा कंपनीच्या स्वतःच्या वाहनांद्वारे प्रवासी सेवा पुरविली जाते. बुधवारी घडलेल्या घटनेमुळे या वाहनांमधून प्रवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ही घटना घडल्यानंतर हिंजवडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक कन्हैय्या थोरात यांनी गुरुवारी (२० मार्च) तातडीने वाहतूक सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावली. ३५ कंपन्यांचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते.

> "हिंजवडी येथे झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर वाहतूक सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधण्यात आला. त्यांना चालकाच्या मानसिक आरोग्याची काळजी घेण्याची सूचना देण्यात आली. तसेच कंपनीतील कर्मचारी, चालक यांच्याशी संवाद वाढविण्यास सांगण्यात आले. हिंजवडी हे मोठे आयटी पार्क असून येथे हजरोंच्या संख्येने कर्मचारी काम करतात. या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षीतेसाठी काय उपापयोजना करता येतील याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.
> **–कन्हैय्या थोरात,** वरिष्ठ पोलिस निरिक्षक, हिंजवडी पोलिस ठाणे

### पोलिसांकडून वाहतूक कंपन्यांना सूचना

- चालकाचे मानसिक आरोग्य संभाळणे
- चालकाच्या वर्तनातील बदल ओळखणे
- कंपनीतील कर्मचारी, चालक, वाहक यांच्यासाठी समुदेशन शिबिर आयोजित करणे
- कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मदत करणे
- एखादा अपघात झाल्यास काय करावे, याचे प्रशिक्षण द्यावे
- वाहन, कंपनीतील अग्निशमन यंत्रणा हताळण्याचे प्रशिक्षण द्यावे
- कोणत्याही अपघाताची शक्यता वाटल्यास वाहन रस्त्याच्या कडेला थांबविण्याची सूचना देणे
- वाहनातील एमर्जिन्सी डोअर, विंडो सुस्थितीत असल्याची खात्री करावी.

### सातत्यपूर्ण संवादातून प्रश्न सोडवा

वाहतूक सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांचे चालक तसेच आयटी कंपन्यांच्या अस्थापनेवरील चालक हे दररोज वाहन चालवत असतात. पुणे ते पिंपरी - चिंचवड परिसरात त्यांचा दररोजचा प्रवास असतो. शहरातील वाहतूक कोंडीतून त्यांना वाहन चालवावे लागते. वाहतूक कोंडीमुळे अनेकदा मोठ्या वाहन चालकांना इतर वाहन चालकांचे बोलणे खावे लागते. अनेक दुचाकी चालक वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करत मोठ्या वाहन चालकांच्या समोर अचानक दुचाकी आडवी घालणे, कट मारणे असे प्रकार करतात. त्यामुळे मोठ्या वाहनांवरील चालकांची चिडचिड होते. तसेच अनेक चालकांना उच्चरक्तदाब, मधुमेह असे आजार असतात. त्याचाही त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. या परस्थितीमध्ये जर कंपनी व्यवस्थापन किंवा इतक कर्मचाऱ्यांशी चालकाचे वाद असतील, तर मोठी घटना घडू शकते.

---

# स्मार्ट सिटी प्रोजेक्ट होणार गतिमान!

## पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी आणि महापालिका इंटीग्रेटेड सॉफ्टवेअरचे काम 2 महिन्यात मार्गी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था प्रत्येकी २५ टक्के आपला हिस्सा देतात. पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी प्रोजेक्टला गतिमान करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगर पालिका आणि पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी यांच्यासाठी एकत्रित काम करणारे सॉफ्टवेअर आवश्यक होते. या इंटीग्रेटेड सॉफ्टवेअरचे काम मे २०२५ मध्ये पूर्ण होणार असल्याची माहिती नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी शुक्रवारी विधान परिषदेत दिली.**




आमदार अमित गोरखे आणि आमदार सत्यजित तांबे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ बोलत होत्या. आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने जीआयएसईआरपीच्या दृष्टीने ११२ कोटी रुपयांची वेगळी निविदा का काढली ? काम संथ गतीने होत असल्याने ९२ लाख रुपयांचा दंड ठोठावला अशा परिस्थितीत कंपनीकडे असलेला डेटा किती सुरक्षित आहे? असा प्रश्न विचारला होता, त्यावर उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले की. २०१९ साली अटॉस इंडिया ला काम देण्यात आले आहे, स्मार्ट सिटी आणि महापालिकेचे सर्व विभाग यांना एकत्र आणण्याचे हे काम आहे, पूर्वी महापालिकेच्या सर्व विभागाचे काम स्वतंत्रपणे चालत असे आता ते सर्व विभाग एकत्रित येतील आणि स्मार्ट सिटी शी सुद्धा कनेक्ट असतील. पूर्वीच्या सॉफ्टवेअर मध्ये जीआय तंत्रज्ञान नव्हते नवीन मध्ये आहे आणि ते ३२० लेयर मध्ये काम करते यामुळे महापालिकेचा डेटा पूर्णपणे सुरक्षित असेल.

### नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची माहिती

**प्रॉपर्टी टॅक्स साठी या सॉफ्टवेअर मार्फत सर्वे करण्यात आला, यात ई ऑफिस सुविधा आहे. यात प्रत्येकाचे डॅश बोर्ड आणि लॉग इन वेगळे असल्याने सुरक्षा, गोपनीयता अधिक चांगल्या पद्धतीने होणार आहे.**

**निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे या दोन कंपन्या एकत्र आलेल्या आहेत. तीन वर्षात काम पूर्ण होणे अपेक्षित होते मात्र झाले नाही यामुळे दंड आकाराला असून काम मे २०२५ पर्यंत काम पूर्ण होणार असल्याचे स्पष्ट केले.**

## प्रासंगीक »

# खाचखळग्यांची वाट!

निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्र आणि आधार जोडणी सुधारणांच्या दिशेने पाऊल उचललं आहे. मात्र, तांत्रिक आणि व्यावहारिक अडचणींमुळे याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया मोठ्या अवघड आहे. मतदार नावे दुरुस्ती, बनावट मतदान रोखण्यासाठी हि उपयुक्त असली तरी गोपनीयता, नागरिकता सिद्धता या मुद्द्यांवर हा विरोध होत आहे.

मतदार ओळखपत्र आणि आधार यांची जोडणी करण्याबाबत निवडणूक आयोगाने केलेले सूतोवाच, हे मतदान प्रक्रियेतील सुधारणांच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणावे लागेल; मात्र वेगवेगळ्या तांत्रिक, व्यावहारिक आणि घटनात्मक अडचणींमधून पार होऊन ते प्रत्यक्ष लागू करण्याचा पल्ला अतिशय दूरवरचा आहे. मतदान प्रक्रियेमध्ये अनेक त्रुटी असल्याचे प्रत्येक निवडणुकीनंतर समोर येते. देशभरात मतदार याद्यांमध्ये प्रचंड घोळ आहेत. महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांची संख्या आश्चर्यकारक पद्धतीने वाढल्याचा आरोप काँग्रेसने केला; तसेच पश्चिम बंगालमध्ये मतदार ओळखपत्रांतील गोंधळही समोर आले आहेत. आधार कार्डाची बायोमेट्रिक रचना पाहता अशा अडचणी दूर करण्यासाठी आधार आणि मतदार ओळखपत्रांची जोडणी, हा एक उपाय ठरू शकतो. ही जोडणी प्रत्यक्षात आली, तर मतदारांची नेमकी ओळख पटवणे आणि त्यायोगे बनावट मतदानास आळा घालणे शक्य होणार आहे. त्याबरोबरच मतदार याद्यांमधील दुबार नावे शोधून वगळणे त्यातून शक्य होईल; तसेच नाव-पत्ता अशा तपशीलांत दुरुस्ती करणे किंवा नवी मतदार नोंदणी अशी कामे मतदारांसाठी सुलभ होऊ शकतील. गेल्या काही काळात नागरिकांच्या खिशात आधार-पॅन-मतदार ओळखपत्रे अशा नवनव्या कार्डांची भरच पडत आहे, त्याऐवजी सर्वांची जोडणी करून एकच बहुउपयोगी कार्ड असावे, असाही एक विचार असून त्या दिशेने ही वाटचाल आहे. या जोडणीचे काही फायदे असून सरकार आणि निवडणूक आयोगही त्यासाठी आग्रही असले, तरी या मार्गात अनेक घटनात्मक आणि व्यावहारिक अडचणींची मालिका उभी आहे. यापूर्वीचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय पाहता निवडणूक आयोगही 'ही जोडणी ऐच्छिक असून, त्यातून मतदान किंवा मतदार नोंदणीचा हक्क नाकारता येणार नाही,' असे सांगून जपूनच पावले टाकत असल्याचे दिसते. सन २०१५मध्ये अशीच आधार व मतदार ओळखपत्र जोडण्याचा 'राष्ट्रीय मतदारयादी शुद्धीकरण आणि ओळख पटविण्याचा कार्यक्रम' हाती घेण्यात आला, त्यात काही लाख कार्डांची जोडणीही झाली. मात्र, दुसरीकडे 'आधारची फक्त कल्याणकारी योजना व पॅनकार्ड जोडणीपुरतीच सक्ती करता येईल,' असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने तो बारगळला. या जोडणीबाबत विरोधक आणि अभ्यासकांचे काही गंभीर आक्षेप आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने आधार कार्डाशी पॅन-बँक खाती असा तपशील जोडलेला असल्याने नव्या जोडणीतून गोपनीयतेच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन होण्याची भीती व्यक्त होते. सध्या ही जोडणी ऐच्छिक असली, तरी यंत्रणांकडून त्याची सक्ती होऊ शकते, अशीही चिंता आहे. आधार हा नागरिकत्त्वाचा पुरावा नसून ते केवळ ओळख पटवणारे कागदपत्र आहे, तर मतदान हा भारतीय नागरिकास दिलेला घटनादत्त अधिकार असल्याने आधारच्या आधारे तो कसा नाकारणार, हा प्रश्न आहे. उलटपक्षी भारतीय नागरिक नसलेल्या अनेकांनी आधारकार्डे मिळविली आहेत, त्यांनी याआधारे मतदान केले तर काय, या विरोधकांच्या प्रश्नातही तथ्य आहे.

# राणेज् 'इन-स्विंग', ठाकरेज् 'दिशा'हीन !





**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

**संस्थापक, संपादक**

**महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या नारायण राणे यांचे कुटुंब आणि उद्धव ठाकरे यांचे कुटुंब एकमेकांना सतत पाण्यात पाहात असल्याचे स्पष्ट दिसते. एकमेकांचा पाणउतारा करण्याची एकही संधी ही दोन्ही घराणी सोडत नाहीत, हे एव्हाना प्रत्येकाच्याच लक्षात आले आहे.**

## राणे सत्ताधारी, ठाकरे विरोधक..

एकेकाळी हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे अगदी जवळचे म्हणून नारायण राणे यांची जगाला ओळख ! त्यांना बाळासाहेबांनी मुख्यमंत्रीपदही बहाल केले होते, एवढा गाढ विश्वास ! बाळासाहेबांनी जबाबदारी टाकायची आणि 'नारबा' ने ती पार पाडायची, हे समीकरण राजकारण्यांना अगदी जवळून अनुभवता आले. पण, आता काळ बदलला, नियतीचे फासे उलटे पडले आणि ही दोन्ही घराणी एकमेकांपासून दुरावली. राणे घराणे या बदलत्या राजकीय परिस्थितीत सत्ताधारी झाले, तर उद्धव ठाकरे यांची सगळीच गणिते चुकली आणि तुटपुंज्या संख्याबळासह त्यांना विरोधी बाकांवर बसावे लागले !

## राणेंकडे एक खासदार, दोन आमदार

एकेकाळी शिवसेनेमध्ये क्रमांक दोनचे पद असतानाही वारंवार अपमानास्पद वागणूक मिळाल्यामुळे नारायण राणे यांनी शिवसेना सोडली आणि काँग्रेस बरोबर घरोबा करून नंतर हळूच भारतीय जनता पार्टी गाठली ! सध्या ते स्वतः खासदार आहेत तर यापूर्वीच्या नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळात ते केंद्रीय मंत्रीही होते.

## नितेश राणे मंत्री, निलेश आमदार

कोकण किनारपट्टीवर राजकीयदृष्ट्या मोठा दबदबा असणारे राणे कुटुंबीय सध्या चांगलेच फॉर्मात आहेत. धाकटे चिरंजीव नितेश हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अगदी 'जवळचे' असून मंत्री आहेत. तर राजकीय जुळणी जमवण्यासाठी मोठे निलेश हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षातील आमदार आहेत.

## दिशा सालियन प्रकरणामुळे चर्चेत..

गेली सुमारे तीन ते चार वर्षे नितेश चांगलेच चर्चेत आहेत. प्रसिद्ध अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची व्यवस्थापिका दिशा सालियन हिची हत्या झाली असून त्यात आदित्य ठाकरे आणि त्याच्या गँगचा समावेश असल्याचा आरोप सतत करणाऱ्या नितेश राणे यांच्यावर राजकारण केंद्रित झाले आणि त्यांना यश मिळत गेले. ठाकरे कुटुंबीयांची कोणतीही बदनामी करण्याची संधी न सोडणारे नितेश नियमितपणे त्यांच्यावर टीकास्त्रे सोडू लागले. मग, ते उद्धव ठाकरे असोत, नाहीतर त्यांचे प्रवक्ते संजय राऊत ! या दोघांना झोडपण्याचा विडाच जणू नितेश यांनी उचलला, भाजपाकडून त्याचे फळही त्यांना मिळाले आणि ते मंत्री बनले! दुसरीकडे, मधल्या काळात निलेश यांच्यावर अपयशाचे छोटेसे खापर फुटले आणि झालेल्या पराभवामुळे ते मागे पडले, हे मान्य करायलाच हवे! पण हे तिन्ही राणे मिळून कोठेही तसूभर सुद्धा कमी पडले नाहीत, हे लक्षात घ्या !

## ठाकरेंचे सल्लागार, पावले चुकली !

बाळासाहेबांचा वारसा चालवत असताना उद्धव ठाकरे यांनी वेळोवेळी उचललेली पावले चुकल्याचे प्रत्येकालाच लक्षात आले असेल. त्यांचा अहंपणा, महत्त्वाकांक्षा किंवा चुकीचे सल्लागार नेमणे, याचा तो परिपाक आहे. भारतीय जनता पक्षाबरोबर 'युती' करून भरघोस मताधिक्याने सत्ता मिळाली असताना २०१९ मध्ये त्यांना अवदसा आठवली आणि आयुष्यभर वंदनीय बाळासाहेबांनी ज्या काँग्रेसला आणि शरद पवार यांना विरोध केला, त्यांच्याशीच हात मिळवणी करून उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद मिळवले. अर्थात् हे जनतेला रुचले नाही, त्याचा फटका त्यांना पुढील राजकारणात बसला आणि आता तर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला.

## पक्ष गेला आणि चिन्हही गेले..

उद्धव ठाकरे यांचा हा निर्णय एवढा अवसानघातकी होता की त्यांचा पक्ष फुटला आणि मोठा गट एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जाऊन भाजपाला मिळाला. हतबल उद्धव ठाकरे तेच तेच आरोप करत बसले आणि संजय राऊत, सुषमा अंधारे यांच्यासारख्या प्रवक्त्यांमुळे बुडत्याचा पाय नेहमी खोलातच गेला.

## डागलेले तोफगोळे फुसके !

उद्धव ठाकरे यांना अलगद बाजूला करून भाजपाने एकनाथ शिंदे यांच्यावर मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी टाकून त्यांचा योग्य सन्मान केला आणि ठाकरे कुटुंबीयांचे उट्टे काढले. त्यांना उद्योगच राहिला नाही, रोज नवीन काहीतरी बडबडत सुटायचे, एवढा एकच उद्योग त्यांना राहिला. एकनाथ शिंदेंचे सरकार हे घटनाबाह्य सरकार आहे, ते या महिन्यात पडणार, हिम्मत असेल तर निवडणुका घ्या, असली फालतू वक्तव्ये करून आणि स्वतःच्याच तालात स्वप्नरंजन करीत त्यांनी निवडणुका गाठल्या. पण, मतदारांनी त्यांना एवढे झिडकारले, की विरोधी पक्षनेता होण्याइतपत सुद्धा त्यांच्याकडे संख्याबळ शिल्लक ठेवले नाही !

## ठाकरेंना उतरती कळा, राणेंची भरारी..

ही सर्व पार्श्वभूमी सांगण्याचे कारण एवढेच की बदलत्या राजकारणात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या राजकारणाला उतरती कळा लागली, असून राणे कुटुंबीय मात्र रोजरोज उत्तुंग भराऱ्या घेत आहे.

## उद्धव यांना विधान परिषदेचा आधार

उद्धव ठाकरे विधान परिषदेचे आमदार आहेत. त्यांनी विधानसभा निवडणूक लढवली असती, तर कदाचित मतदानावर सकारात्मक परिणाम होऊन त्यांच्या जागा कदाचित वाढल्या असत्या. तीस जागा मिळाल्या असत्या, तर कदाचित विधानसभेत अधिकृत विरोधी पक्षनेता हे पद मिळू शकले असते. काँग्रेसची जी मानसिकता आहे, तीन आता त्यांच्या गटाची झाली आहे. केंद्रात काँग्रेसने जेव्हा अधिकृत विरोधी पक्षनेता पद म्हणजे घटनात्मक पद मिळते आहे, असे बघितले तेव्हा राहुल गांधी यांना त्या पदावर बसवले. इकडे महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांचे विधानसभेत नेते म्हणून भास्कर जाधव यांना नेमण्यात आले.

## विरोधी पक्षनेत्याला मान्यता कुठे?

पण, अधिवेशन संपत आले तरी त्यांना मान्यता मिळालेली नाही. उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य यांना त्यांची विधानसभेची पहिली निवडणूक बरीच सोपी गेली. दुसऱ्या निवडणुकीत त्यांची दमछाक झाली. घराण्याच्या वलयाचा त्यांना फायदा झाला आणि आता निदान माध्यमांमध्ये ते महत्त्वाचे नेते मानले जातात. पण, प्रभावी नेता म्हणून त्यांना बरीच मजल मारायची आहे एवढे नक्की.

आदित्य यांच्यापुढे आव्हाने आहेत. जनाधार गमावलेला पक्ष त्यांना पुन्हा उभा करायचा आहे, त्यासाठी योग्य ते सल्लागार आणि बुद्धिवंत जोडीला असणे महत्त्वाचे आहे. उद्धव ठाकरे यांचे ठोकताळे भरकटले, पण आदित्य यांना विचारपूर्वकच निर्णय घ्यावे लागतील. विशेषतः, राणे कुटुंबीय सत्तेवर असल्यामुळे त्यांची मोठी अडचण करू शकतात!

## म्हणूनच ठाकरे आणि राणेची तुलना..

ठाकरे आणि राणे यांची तुलना करण्याचा हेतू नाही. पण, राणे हे बाळासाहेब ठाकरे यांचे एक आवडते शिष्य..त्यांना मुख्यमंत्री होण्याची संधी मिळाली. पण, पुढे ठाकरे यांच्या विरोधात गेल्याने राणे यांच्यापुढे मोठा संघर्ष उभा राहिला. राणे काँग्रेस पक्षात गेले. पण, त्यांना दिलेला शब्द पाळला गेला नाही. अखेर राणे यांनी भारतीय जनता पक्षात जाऊन आपले व्यवस्थित पुनर्वसन करुन घेतले, त्यांनी दोन्ही मुलांना देखील राजकारणात बस्तान बसवून दिले.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कबर तोडायला तुमची मुलं पाठवा!

## अमित शाह यांच्यासमोरील संजय राऊत यांचं भाषण चर्चेत

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्यात गेल्या काही दिवसांपासून पेटलेला औरंगजेबच्या कबरीचा मुद्दा आता राज्यसभेत पोहचला असून, शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी हात मुद्दा आज राज्यसभेत उपस्थित केला. यावेळी ते म्हणाले, मणिपूरनंतर महाराष्ट्र जळत आहे, नागपूरमध्येही दंगली होत आहेत. गृह मंत्रालयाने गेल्या काही वर्षांत देशाला पोलीस स्टेट (सरकारी नियंत्रण) बनवले आहे. याचबरोबर संजय राऊत यांनी केंद्र सरकारला औरंगजेबची कबर तोडण्याचे आव्हान दिले व औरंगजेबाची कबर तोडण्यासाठी तुमच्या परदेशात शिकत असलेल्या मुलांना पाठवा असेही म्हटले. दरम्यान संजय राऊत यांच्या या भाषणावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहदेखील सभागृहात उपस्थित होते.**



गृह मंत्रालयाच्या कामकाजावरील चर्चेत सहभागी होत, राऊत यांनी सरकारवर टीका केली. त्यांनी आरोप केला की देशाला अस्थिर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्ती वारंवार औरंगजेबाचे नाव घेत आहेत, ज्यामध्ये महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि केंद्र सरकारमधील वरिष्ठ पदांवर असलेल्या लोकांचा समावेश आहे.“जर तुम्हाला औरंगजेबाची कबर तोडायची असेल तर खुशाल तोडा, तुम्हाला कोण रोखत आहे. केंद्रात आणि राज्यात तुमचे सरकार आहे. मुख्यमंत्री तुमचे आहेत, गृहमंत्री तुमचे आहेत तिथे जावा आणि तोडा. पण कबर तोडण्यासाठी तुमच्या मुलांना पाठवा आमच्या नाही. तुमची मुलं परदेशात शिक्षण घेत आहेत, परदेशात नोकरी करत आहेत आणि गरीब मुलांची माथी भडकावून ही कामे करायला लावत आहात.”महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातील दंगलींचा संदर्भ देत संजय राऊत पुढे म्हणाले की, “आतापर्यंत मणिपूर जळत होते पण आता महाराष्ट्रही जळत आहे.”गेल्या ३०० वर्षात नागपूरमध्ये एकही दंगली झालेली नाही, असे सांगून राऊत म्हणाले, “औरंगजेबाचे नाव पुन्हा पुन्हा घेऊन देशाला अस्थिर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींपैकी काही महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि केंद्र सरकारमधील वरिष्ठ पदांवरील लोक आहेत. जर आपण त्यांना रोखले नाही तर हा देश एकसंध आणि एकात्मिक राहणार नाही”.यावेळी संजय राऊत असेही म्हणाले की,“देशाची एकता आणि अखंडता राखणे हे गृह मंत्रालयाचे काम आहे, परंतु गेल्या काही वर्षांत देशाचे रूपांतर पोलीस स्टेटमध्ये (सरकार नियंत्रित) झाले आहे. गृह मंत्रालय राजकीय विरोधकांना कमकुवत करत आहे आणि राजकीय पक्ष फोडत आहे.”छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी विश्व हिंदू परिषदेने केलेल्या आंदोलनामध्ये धार्मिक साहित्य जाळल्याच्या अफवांवरून सोमवारी संध्याकाळी नागपूरच्या अनेक भागात मोठ्या प्रमाणात दगडफेक आणि जाळपोळ करण्यात आली. नागपुरात झालेल्या हिंसाचारात पोलिस उपायुक्त दर्जाच्या तीन अधिकाऱ्यांसह तेहतीस पोलिस कर्मचारी जखमी झाले आहेत. नागपूरमधील न्यायालयाने या प्रकरणातील १७ आरोपींना २२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. हिंसाचारातील प्रमुख आरोपी फहीम खान आणि इतर पाच जणांवर देशद्रोह आणि सोशल मीडियावर खोटी माहिती पसरवल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### आता महाराष्ट्रही जळत आहे

”महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातील दंगलींचा संदर्भ देत संजय राऊत पुढे म्हणाले की, “आतापर्यंत मणिपूर जळत होते पण आता महाराष्ट्रही जळत आहे.”गेल्या ३०० वर्षात नागपूरमध्ये एकही दंगली झालेली नाही, असे सांगून राऊत म्हणाले, “औरंगजेबाचे नाव पुन्हा पुन्हा घेऊन देशाला अस्थिर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींपैकी काही महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि केंद्र सरकारमधील वरिष्ठ पदांवरील लोक आहेत. जर आपण त्यांना रोखले नाही तर हा देश एकसंध आणि एकात्मिक राहणार नाही”.यावेळी संजय राऊत असेही म्हणाले की, “देशाची एकता आणि अखंडता राखणे हे गृह मंत्रालयाचे काम आहे.

---

# शिंदे शेती करायला हेलिकॉप्टरने का जातात?

## उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले हेलिकॉप्टर प्रवासामागचे कारण

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांची सातारा जिल्ह्यातील दरे गावची शेती आणि हेलिकॉप्टर प्रवासामुळे गेल्या दोन-तीन वर्षांपासून सतत चर्चेत असतात. अनेकदा विरोधी पक्षांनी विशेष करून शिवसेनेने (उद्धव ठाकरे) त्यांना शेती आणि हेलिकॉप्टर प्रवासावरून लक्ष्य केले आहे. अशात आता एकनाथ शिंदे यांनी शेती करण्यासाठी त्यांचे साताऱ्यातील मूळ गाव दरेला हेलिकॉप्टरमधून का जातात याचे उत्तर दिले आहे.**





दरे गावातील शेती आणि हेलिकॉप्टर प्रवासाबाबत विचारले असता एकनाथ शिंदे म्हणाले, “मी शेतकऱ्याचा मुलगा असल्याने गावी जातो. तेव्हा काही लोक म्हणतात मी शेती करायला हेलिकॉप्टरने जातो. मी गाडीने गेलो तर गावी जायला सात-आठ तास लगतील. या सात-आठ तासांत मी दहा हजार सह्या करू शकतो. सह्यांमध्ये माझे रेकॉर्ड आहे.”एबीपी माझाच्या, माझा व्हिजन या कार्यक्रमात बोलताना, एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, “गावी गेल्यानंतर मी गावकऱ्यांच्या भेटी होता. तिथे मी अधिकाऱ्यांनाही बोलावतो. गावी आम्ही क्लस्टर शेती करतो. आम्ही तिकडे ५०० प्रकारच्या औषधी वनस्पतींची लागवड केली आहे. याचबरोबर बांबूची शेतीही करतो. तिथल्या तरुणांना नोकरीसाठी इतर शहरांत यावे लागून नये ही यामागची माझी संकल्पना आहे. त्याला तिथेच नोकरी मिळाली पाहीजे. तिथे कोयनेच्या बॅक वॉटरमध्ये, वॉटर स्पोर्ट्स सुरू केले आहेत. आताचे हिल स्टेशन्स ब्रिटिश काळातील आहेत. आता आपण करत असलेले नवे महाबळेश्वर हे पहिले हिल स्टेशन असेल.”२०२३ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सातारा जिल्ह्यातील त्यांच्या दरे गावी हेलिकॉप्टरने गेले होते. गावी जाऊन त्यांनी शेती केली होती. शेती करतानाचे त्यांचे व्हिडीओ आणि फोटो सोशल मीडियावरून व्हायरल झाले होते. यावरून विरोधकांनी, , शेतकऱ्याचा मुलगा हेलिकॉप्टरने फिरतो म्हणून टोला लगावला होता. विरोधकांच्या या टीकेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिप्रश्न करत शेतकऱ्याच्या मुलाने हेलिकॉप्टरने फिरू नये का असा प्रतिप्रश्न केला होता.त्यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले होते की, “काही लोकांना वावडं आहे की मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. मी शेतकऱ्याचा मुलगा आहे हे काही लोकांना सहन होत नाही. शेतकऱ्याच्या मुलाने हेलिकॉप्टने फिरू नये का? शेतकऱ्याच्या मुलाने चांगल्या गाडीतून फिरू नये? बंदी आहे का?

### गाडीने गेलो तर आठ तास लगतील

दरे गावातील शेती आणि हेलिकॉप्टर प्रवासाबाबत विचारले असता एकनाथ शिंदे म्हणाले, “मी शेतकऱ्याचा मुलगा असल्याने गावी जातो. तेव्हा काही लोक म्हणतात मी शेती करायला हेलिकॉप्टरने जातो. मी गाडीने गेलो तर गावी जायला सात-आठ तास लगतील. या सात-आठ तासांत मी दहा हजार सह्या करू शकतो.

# कर्नाटकात हनी ट्रॅपचा मुद्दा तापला!

## भाजपाच्या 18 आमदारांचं निलंबन, सभागृहात मोठा गदारोळ

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कर्नाटकमध्ये सध्या हनी ट्रॅपचा मुद्दा चांगलाच तापला आहे. सहकार मंत्री के.एन.राजन्ना यांनी विधानसभेत बोलताना केलेल्या एका दाव्यानंतर राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. एका केंद्रीय नेत्यासह ४८ नेते हनी ट्रॅपमध्ये अडकल्याचा दावा मंत्री के.एन. राजन्ना यांनी केला. त्यांच्या या दाव्यानंतर आज कर्नाटकच्या विधानसभेत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना चांगलंच घेरलं.**



यातच आज कर्नाटक सरकारने सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारं विधेयक मंजूर केलं. त्यामुळे हनी ट्रॅपचा मुद्दा आणि सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारं विधेयकाच्या विरोधात भारतीय जनता पक्षाच्या आमदारांनी विधानसभेत मोठा गदारोळ केला. सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. एवढंच नाही तर काही आमदारांनी विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीवर काही कागदपत्रे भिरकावली. त्यामुळे सभागृहात गोंधळ घातल्याप्रकरणी आता भाजपाच्या १८ आमदारांवर निलंबन कारवाई करण्यात आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.भारतीय जनता पक्षाच्या १८ आमदारांचं ६ महिन्यांसाठी निलंबन करण्यात आलं आहे. दरम्यान, हनी ट्रॅप प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींमार्फत चौकशी करण्याची मागणी भाजपाच्या आमदारांनी केली होती. तसेच या कथित हनी ट्रॅप प्रकरणावरून शुक्रवारी विरोधी भाजपाच्या आमदारांनी सभागृहात कागदपत्रे फाडून गोंधळ घातला होता. त्यामुळे या कारणावरून कर्नाटक विधानसभेच्या अध्यक्षांनी भाजपाच्या १८ आमदारांना सहा महिन्यांसाठी निलंबित केलं आहे.दरम्यान, या १८ आमदारांनी विधानसभेच्या कामकाजात अडथळा आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच विधानसभेच्या अध्यक्षांच्या आदेशाचं उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.तसेच निलंबित आमदारांपैकी काही आमदारांनी विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीपर्यंत जाऊन कागदपत्रे भिरकावल्याचा आरोप आता सत्ताधारी आमदारांनी केला. यानंतर अखेर आज भाजपाच्या १८ आमदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.निलंबित करण्यात आलेल्या आमदारांमध्ये विरोधी पक्षाचे मुख्य सचेतक दोड्डानागौडा एच पाटील, अश्वथ नारायण सीएन, एसआर विश्वनाथ, बीए बसवराज, एमआर पाटील, चन्नाबासप्पा (चन्नी), बी सुरेश गौडा, उमानाथ ए कोट्यान, शरणु सालगर, शैलेंद्र बेलदाले, सीके रामामूर्ती, यशपाल ए सुवर्णा, बीपी हरीश, भरत शेट्टी वाय, मुनीरत्ना, बसवराज मट्टीमूद, धीरज मुनीराजू आणि चंद्रू लमाणी यांचा समावेश आहे. आज कर्नाटक सरकारने सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारं विधेयक मंजूर केलं. त्यामुळे हनी ट्रॅपचा मुद्दा आणि सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारं विधेयकाच्या विरोधात भारतीय जनता पक्षाच्या आमदारांनी विधानसभेत मोठा गदारोळ केला. सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. एवढंच नाही तर काही आमदारांनी विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीवर काही कागदपत्रे भिरकावली. त्यामुळे सभागृहात गोंधळ घातल्याप्रकरणी आता भाजपाच्या १८ आमदारांवर निलंबन कारवाई करण्यात आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.भारतीय जनता पक्षाच्या १८ आमदारांचं ६ महिन्यांसाठी निलंबन करण्यात आलं आहे. दरम्यान, हनी ट्रॅप प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींमार्फत चौकशी करण्याची मागणी भाजपाच्या आमदारांनी केली होती. तसेच या कथित हनी ट्रॅप प्रकरणावरून शुक्रवारी विरोधी भाजपाच्या आमदारांनी सभागृहात कागदपत्रे फाडून गोंधळ घातला होता.

### 18 आमदारांचं निलंबन

या कारणावरून कर्नाटक विधानसभेच्या अध्यक्षांनी भाजपाच्या १८ आमदारांना सहा महिन्यांसाठी निलंबित केलं आहे.दरम्यान, या १८ आमदारांनी विधानसभेच्या कामकाजात अडथळा आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच विधानसभेच्या अध्यक्षांच्या आदेशाचं उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली.

# इस्रायलच्या हल्ल्यांत शेकडो लोकांचा मृत्यू!

## इस्रायली सैन्याला गाझ्यातील आणखी जमीन ताब्यात घेण्याचे आदेश

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**हमासने त्यांच्या ताब्यात असलेल्या ओलिसांना सोडले नाही आणि युद्धबंदीचे वचन पाळले नाही, असे कारण देत इस्रायली सैन्याने गाझामध्ये पुन्हा कारवाई सुरू केली आहे. आता एका इस्रायली मंत्र्याने लष्कराला गाझा पट्टीत कायमस्वरूपी व्याप क्षेत्र तयार करण्याचे आदेश दिले आहेत.**



या मंत्र्याने इस्रायली संरक्षण दलांना गाझामधील आणखी जमीन ताब्यात घेण्याचे निर्देश दिले आहेत.गाझा पट्टीत इस्रायली सैन्याने केलेल्या ताज्या लष्करी कारवाईमुळे या भागात मोठ्या प्रमाणात विध्वंस झाला आहे.गेल्या तीन दिवसांत इस्रायली हवाई आणि जमिनीवरील हल्ल्यांमध्ये जवळपास ६०० जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. इस्रायली सैन्याने गाझाच्या दक्षिण आणि उत्तरेकडील भागात एकाच वेळी हल्ला केला आहे, त्यानंतर या भागातील परिस्थिती आणखी तणावपूर्ण बनली आहे. इस्रायली सैन्याने म्हटले आहे की, दक्षिण गाझामधील रफाहवर जमीनी हल्ला सुरू आहे आणि सैन्य उत्तरेकडे बेत लाहिया शहर आणि मध्य भागांकडे सरकत आहे. जानेवारी २०२५ मध्ये युद्धबंदीची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर युद्धबंदीचा भंग झाल्यानंतर हा हल्ला झाला. त्यामुळे गाझात गेली दोन महिने असलेली शांतता संपुष्टात आली आहे. गाझाच्या आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, मंगळवारपासून सुरू झालेल्या हल्ल्यात आतापर्यंत शेकडो लोक मारले गेले आहेत आणि हजारो जखमी झाले आहेत. मंगळवारी रात्री सुरू झालेल्या बॉम्बहल्ल्यांमध्ये ४०० हून अधिक लोक मारले गेले असून, तेव्हापासून मृतांचा आकडा वेगाने वाढत असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे.ह

मासच्या दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला करण्यासाठी हे हल्ले करण्यात आल्याचा दावा इस्रायली सैन्याने केला आहे. पण, स्थानिकांचे म्हणणे आहे की, हल्ल्यांमध्ये नागरिकांची घरे आणि वस्त्या देखील उद्ध्वस्त झाल्या आहेत.गाझा पट्टीत सध्या सुरू असलेल्या इस्रायल-हमास युद्धाने जगभरात चिंतेचे वातावरण आहे. या संघर्षात दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे, आणि तणाव खूपच तीव्र झाला आहे.

### 2023 पासून इस्रायल-हमास संघर्ष

हमासने ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्रायलवर हल्ले केले होते. या हल्ल्यांमध्ये अनेक इस्राईली नागरिकांना जीव गमवावा लागला. याचबरोबर हमासने शेकडो इस्रायली नागरिकांना ओलिस ठेवले होते. त्यानंतर, इस्रायलने गाझा पट्टीत हमासच्या तळांवर हल्ले सुरू केले, आणि या संघर्षाने आणखी तीव्र व हिंसक रूप घेतले.

# जुही चावलाबरोबरही होतं आमिरचं अफेअर?




बॉलीवूडमध्ये 'मिस्टर परफेक्शनिस्ट' म्हणून ओळखला जाणारा अभिनेता आमिर खान (AAMIR KHAN) सध्या चांगलाच चर्चेत आहे. नुकतंच त्याने त्याची प्रेयसी गौरी स्प्रॅटची माध्यमांसमोर ओळख करुन दिली करून दिली. यामुळे तो चांगलाच लाईमलाइटमध्ये आहे. हे दोघेही एकमेकांना २५ वर्षांपासून ओळखतात. पण त्यांचे प्रेमसंबंध गेल्या दीड वर्षापूर्वी सुरू झाले. यामुळे आता आमिरच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल आणि हकलाकारांबरोबरच्या पूर्वीच्या संबंधांबद्दलच्या चर्चांनीही जोर धरला आहे. आमिरचे त्याच्या महिला सहकलाकारांशी अनेकदा नाव जोडले गेले आहे. लेहरेनला दिलेल्या जुन्या मुलाखतीत त्याने या अफवांबद्दल उघडपणे भाष्य केले होते. याबद्दल तो म्हणालेला की,"माझं माधुरीशी (MADHURI DIXIT) अफेअर आहे, हे वृत्तांमध्ये आलं आहे. माझं जुहीशीअफेअर आहे, हेही आलंय. मी पूजा भट्टला लग्नाची मागणी घातली होती, हेही आलं आहे. त्यामुळे अशा अनेक गोष्टी बातम्यांमधून आल्या आहेत. पण त्याचा काही परिणाम होत नाही."गेल्या काही वर्षांत त्याच्याबद्दल अनेक अफवा पसरल्या आहेत. परंतु, याबद्दल त्याने अनेकदा शांत आणि संयमाने भाष्य केलं आहे. १९८६ मध्ये आमिरने रीना दत्ताशी लग्न केलं. त्यानंतर दोघे जुनैद आणि आयरा या दोन मुलांचे पालक झाले. मात्र त्यांचं हे नातं २००२ मध्ये संपलं.

# मानसी सध्या काय करते?

“दिस चार झाले मन, पाखरू होऊन…”, या गाण्याने प्रेक्षकांच्या मनावर एक वेगळीच जादू निर्माण केली आहे. २००६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आईशप्पथ' चित्रपटातील हे गाणं साधना सरगम यांनी गायलं आहे. या गाण्याचा उल्लेख जरी केला तरी डोळ्यासमोर मानसी साळवीचं नाव येतं. मराठी व हिंदी मालिकांमध्ये आपलं अढळ स्थान निर्माण करणारी लोकप्रिय अभिनेत्री म्हणून मानसी साळवीला ओळखलं जातं. टेलिव्हिजनवर गाजलेल्या 'असंभव' मालिकेत सुद्धा तिने काम केलं होतं. मात्र, तिने ही मालिका मध्येच सोडण्याचा निर्णय घेतला. नुकत्याच 'आरपार' या युट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत अभिनेत्रीने याबद्दल खुलासा केला आहे. 'असंभव' मालिका टेलिव्हिजनवर प्रचंड गाजली होती. या मालिकेत उमेश कामत आणि मानसी साळवी यांच्या प्रमुख भूमिका होत्या. मात्र, मानसीने मालिका सोडल्यावर पुढे या मालिकेत उर्मिला कानेटकरची एन्ट्री झाली होती.मानसी 'असंभव' मालिकेतून ब्रेक घेण्याविषयी म्हणाली, “असंभव' मालिकेच्या शूटिंगदरम्यान मी गरोदर होते. ती मालिका अतिशय गूढ होती. काळी जादू, टोचलेल्या बाहुल्या असं कथानक होतं. मग मला असं वाटलं प्रेग्नन्सीमध्ये हे सगळं नाही पाहायचंय.

त्यात मी साकारणाऱ्या भूमिकेसाठी बऱ्याचदा घाबरण्याचा अभिनय करायचा होता. हे सगळं गरोदरपणात माझ्या बाळासाठी मलाच योग्य वाटत नव्हतं."मला तेव्हा पल्लवी जोशी म्हणाली होती की, आपण शुभ्रा या भूमिकेला गरोदर दाखवूया वगैरे... पण, मी तिला बोलले आता थांबलं पाहिजे. कारण, मी बरीच वर्षे काम करत होती. मला तेव्हा माझं मातृत्व व्यवस्थित अनुभवायचं होतं. मला पुस्तकं वाचायची होती, सहस्त्रनाम, सुक्तम वगैरे रोज बोलायचं होतं. त्यामुळेच मी मालिका सोडली.” असं मानसीने सांगितलं.मानसी 'असंभव' मालिकेतून ब्रेक घेण्याविषयी म्हणाली, “असंभव' मालिकेच्या शूटिंगदरम्यान मी गरोदर होते. ती मालिका अतिशय गूढ होती. काळी जादू, टोचलेल्या बाहुल्या असं कथानक होतं. मग मला असं वाटलं



प्रेग्नन्सीमध्ये हे सगळं नाही पाहायचंय. त्यात मी साकारणाऱ्या भूमिकेसाठी बऱ्याचदा घाबरण्याचा अभिनय करायचा होता. हे सगळं गरोदरपणात माझ्या बाळासाठी मलाच योग्य वाटत नव्हतं."“मला तेव्हा पल्लवी जोशी म्हणाली होती की, आपण शुभ्रा या भूमिकेला गरोदर दाखवूया वगैरे... पण, मी तिला बोलले आता थांबलं पाहिजे. कारण, मी बरीच वर्षे काम करत होती. मला तेव्हा माझं मातृत्व व्यवस्थित अनुभवायचं होतं. मला पुस्तकं वाचायची होती, सहस्त्रनाम, सुक्तम वगैरे रोज बोलायचं होतं. त्यामुळेच मी मालिका सोडली.” असं मानसीने सांगितलं.लेकीचा जन्म झाल्यावर मानसीने काही वर्षांनी पुन्हा एकदा हिंदी मालिकांमध्ये काम करण्यास सुरुवात केली होती. यानंतर २०२० मध्ये 'झी मराठी'वरील 'काय घडलं त्या रात्री?' या मालिकेच्या निमित्ताने जवळपास १३ वर्षांनंतर मानसी मराठी मालिकाविश्वात परतली. सध्या 'गुम है किसी के प्यार में' या हिंदी मालिकेत ती महत्त्वपूर्ण भूमिका साकारतेय. आजही मानसीचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. गेली २९ वर्षे ही अभिनेत्री रसिक प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन करत आहे. भविष्यात चांगल्या मराठी प्रोजेक्टमध्ये काम करण्याची इच्छा आहे असंही मानसीने यावेळी सांगितलं.

“दिस चार झाले मन, पाखरू होऊन…”, या गाण्याने प्रेक्षकांच्या मनावर एक वेगळीच जादू निर्माण केली आहे. २००६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आईशप्पथ' चित्रपटातील हे गाणं साधना सरगम यांनी गायलं आहे. या गाण्याचा उल्लेख जरी केला तरी डोळ्यासमोर मानसी साळवीचं नाव येतं. मराठी व हिंदी मालिकांमध्ये आपलं अढळ स्थान निर्माण करणारी लोकप्रिय अभिनेत्री म्हणून मानसी साळवीला ओळखलं जातं. टेलिव्हिजनवर गाजलेल्या 'असंभव' मालिकेत सुद्धा तिने काम केलं होतं. मात्र, तिने ही मालिका मध्येच सोडण्याचा निर्णय घेतला. नुकत्याच 'आरपार' या युट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत अभिनेत्रीने याबद्दल खुलासा केला आहे. 'असंभव' मालिका टेलिव्हिजनवर प्रचंड गाजली होती.

# हेमंत ढोमे व क्षिती जोगची रोमँटिक डेट कशी असते?

दिग्दर्शक व अभिनेता हेमंत ढोमे हा काही दिवसांपासून त्याच्या 'फसक्लास दाभाडे' या चित्रपटामुळे चर्चेत होता. चित्रपटगृहात धुमाकूळ घातल्यानंतर या सिनेमाला ओटीटीवरदेखील प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. हेमंत ढोमे आणि त्याची पत्नी व अभिनेत्री क्षिती जोग हे त्यांच्या चित्रपटाबरोबरच त्यांच्या वक्तव्यामुळेदेखील अनेकदा चर्चेत असतात. क्षिती व हेमंत ढोमेने मुलाखतींमधून त्यांच्या लग्नाबद्दल, ते कधी प्रेमात पडले, त्यांच्या नात्याबद्दल, एकमेकांशी लग्न करण्याच्या निर्णयाबद्दल त्यांनी घरी कधी सांगितले, याबद्दल वक्तव्य केले आहे. आता त्यांच्या एका मुलाखतीत त्यांनी त्यांची रोमँटिक डेट कशी असते, यावर वक्तव्य केले आहे.हेमंत ढोमे व क्षिती जोग यांनी राजश्री मराठीला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत त्यांची रोमँटिक डेट कशी असते, हेमंतची काय कल्पना असते यावर क्षिती जोग म्हणाली, “हेमंत मला म्हणतो, रविवारी सकाळी मी मार्केटमध्ये जातो, मासे घेऊन येतो. आपण मस्त एकत्र ते बनवू. जेवण करू. एसी लावू. मस्त काहीतरी बघत झोपून जाऊ. ही त्याची लंच डेट किंवा डिनर डेट असते. कधीतरी मला त्याला सांगावं लागतं की, मी तुला बाहेर घेऊन जाते. त्यावर त्याचं म्हणणं असतं

की, बाहेर कशाला? घरात बसू, जेवण करू. त्याला बाहेर जायला आवडतं. पण, ज्याला आपण रोमँटिक डेट म्हणू ते त्याला फारसं आवडत नाही.” त्यावर हेमंतने, “रेस्टॉरंटमध्ये गेल्यानंतर ते म्युझिक वाजत असतं, डिस्टर्ब होतं”, असे म्हणत त्याला घरीच वेळ घालवायला आवडत असल्याचे म्हटले. हेमंत ढोमे हा त्याच्या झिम्मा, झिम्मा २, फसक्लास दाभाडे या चित्रपटांच्या दिग्दर्शनासाठी ओळखला जातो. त्याआधी त्याने अनेक चित्रपटांत अभिनय केला आहे. फसक्लास दाभाडे हा चित्रपट नुकताच भेटीला आला होता. या चित्रपटात क्षिती जोग, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर हे कलाकार प्रमुख भूमिकांत दिसले होते. कौटुंबिक विषयावर आधारित हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस पडला होता.आता हेमंत ढोमे व क्षिती कोणत्या प्रोजेक्टमधून आगामी काळात प्रेक्षकांच्या भेटीला येणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. चित्रपटाबरोबरच अभिनेता सोशल मीडियावरदेखील सक्रिय असतो. त्याच्या सोशल मीडियावरील पोस्ट प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसतात. हेमंत ढोमे 'क्षणभर विश्रांती', 'मंगलाष्टक वन्स मोअर', 'ऑनलाईन बिनलाईन', 'बघतोस काय मुजरा कर', 'हिरकणी', 'चोरीचा मामला' या चित्रपटांत महत्त्वाच्या भूमिकांत दिसला आहे.

# अखेर पाकिस्तानचा झाला विजय!

## तिसऱ्या टी-20 मध्ये हसन नवाझचं झंझावाती शतक

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हसन नवाझच्या ४५ चेंडूत नाबाद १०५ धावांच्या तडाखेबंद खेळीच्या जोरावर पाकिस्तानने न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या ट्रेन्टी२० सामन्यात दणदणीत विजय मिळवला. न्यूझीलंडने दोन सामने जिंकत तीन सामन्यांची मालिका आधीच जिंकली होती.**



तिसऱ्या लढतीत पाकिस्तानने शानदार खेळ करत बाजी मारली. चॅम्पियन्स ट्रॉफी आणि त्याआधी घरच्या मैदानावर न्यूझीलंडबरोबर झालेल्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानला पराभव सहन करावा लागला होता. सध्या हलाखीच्या परिस्थितीतून जाणाऱ्या पाकिस्तान संघाला चालू वर्षात हा तिसरा सामना जिंकण्यात यश मिळवले आहे. पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने मार्क चॅपमनच्या ९४ खेळीच्या जोरावर २०४ धावांची मजल मारली. चॅपमनने ४४ चेंडूत ११ चौकार आणि ४ षटकारांसह ही खेळी सजवली. कर्णधार मायकेल ब्रेसवेलने १८ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांसह ३१ धावा केल्या. पाकिस्तानतर्फे हारिस रौफने ३ तर शाहीन शहा आफ्रिदी, अब्बास आफ्रिदी आणि अबरार अहमदने प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना मोहम्मद हॅरिस आणि हसन नवाझ यांनी ७४ धावांची दमदार सलामी दिली. २० चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ४१ धावांची खेळी केली. कर्णधार सलमान अघाने हसन नवाझला चांगली साथ देत पाकिस्तानच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. ऑकलंडच्या छोट्या मैदानाचा फायदा उठवत नवाझने न्यूझीलंडच्या गोलंदाजांचा खरपूर समाचार घेतला. इश सोधीच्या २ षटकात २८ धावा कुटण्यात आल्या. बेन सीअर्सच्या ४ षटकात ५१ धावा चोपण्यात आल्या. तिसरा टी२० सामना खेळणाऱ्या २२वर्षीय नवाझने थेट शतकाला गवसणी घातली.काही दिवसांपूर्वी झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत यजमान पाकिस्तानवर प्राथमिक फेरीतच गाशा गुंडाळण्याची नामुष्की ओढवली. पाकिस्तानच्या प्रमुख खेळाडूंची कामगिरीही यथातथाच झाली. पाकिस्तानने कोट्यवधी रुपये खर्चून मैदानांचं नूतनीकरण केलं होतं. मात्र पाकिस्तानला चांगली कामगिरी करता आली नाही. माजी खेळाडूंनी संघावर जोरदार टीका केली. न्यूझीलंड दौऱ्यासाठी पाकिस्तानने प्रमुख खेळाडूंना विश्रांती दिली. दुसरीकडे प्रमुख खेळाडू आयपीएलकरता रवाना झाल्याने न्यूझीलंडनेही दुय्यम संघ निवडला.

### पाकिस्तानने चांगलं पुनरागमन केलं

पहिल्या दोन लढतीत पराभव पदरी पडलेल्या पाकिस्तानने तिसऱ्या लढतीत चांगलं पुनरागमन केलं.टी२० क्रिकेटमध्ये पाकिस्तानसाठी शतक झळकावणारा नवाझ केवळ चौथा खेळाडू ठरला आहे. याआधी बाबर आझम, अहमद शेहझाद, मोहम्मद रिझवान यांनाच शतक झळकावता आलं होतं. तरुण तडफदार नवाझने आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत खणखणीत शतकी खेळी साकारली. न्यूझीलंडमध्ये टी२० प्रकारात शतक झळकावणारा नवाझ दहावा खेळाडू ठरला.तिसऱ्या लढतीत पाकिस्तानने शानदार खेळ करत बाजी मारली. चॅम्पियन्स ट्रॉफी आणि त्याआधी घरच्या मैदानावर न्यूझीलंडबरोबर झालेल्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानला पराभव सहन करावा लागला होता. सध्या हलाखीच्या परिस्थितीतून जाणाऱ्या पाकिस्तान संघाला चालू वर्षात हा तिसरा सामना जिंकण्यात यश मिळवले आहे.

# आयपीएल'मध्ये चेंडूला 'लाळे'ची लकाकी

## लाळेच्या वापरावर आलेले निर्बंध उठविणारी 'आयपीएल' ही पहिलीच स्पर्धा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) आगामी हंगामात चेंडूला लकाकी आणण्यासाठी लाळेचा वापर करण्यास भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) परवानगी दिली आहे. त्यामुळे करोनाच्या पार्श्वभूमीवर, लाळेच्या वापरावर घालण्यात आलेले निर्बंध उठविणारी 'आयपीएल' ही क्रिकेटविश्वातील पहिलीच स्पर्धा ठरणार आहे.**



'आयपीएल'च्या आगामी हंगामाला शनिवारपासून (२२ मार्च) सुरुवात होणार असून त्याआधी दहाही संघांच्या कर्णधारांची गुरुवारी मुंबई येथे बैठक झाली. या बैठकीत कर्णधारांनी 'बीसीसीआय'च्या प्रस्तावास मान्यता दिली. चेंडूवर लाळेचा वापर करण्यास घालण्यात आलेली बंदी आता उठविण्यात आली आहे. 'आयपीएल'मधील काही कर्णधार या निर्णयाच्या पक्षात नव्हते, तर काही साशंक होते. मात्र, बहुतांश कर्णधारांनी या प्रस्तावास पाठिंबा दर्शविल्याने आता चेंडूला लकाकी आणण्यासाठी लाळेचा वापर करता येणार आहे," असे 'बीसीसीआय'च्या अधिकाऱ्याने सांगितले.चेंडूला लकाकी आणण्यासाठी पूर्वीपासून लाळेचा वापर करण्यात येत होता. मात्र, करोनाकाळात आरोग्यविषयक खबरदारी म्हणून चेंडूवर लाळेचा वापर करण्यास तात्पुरती बंदी घालण्यात आली होती. पुढे २०२२ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) हा निर्णय कायम ठेवला. या पार्श्वभूमीवर, 'बीसीसीआय'नेही 'आयपीएल'साठी असाच नियम केला होता.आयपीएल'मधील सर्व संघांच्या कर्णधारांची मुंबई येथील 'बीसीसीआय'च्या मुख्यालयात गुरुवारी बैठक झाली. ही बैठक दुपारी १२.३० वाजता नियोजित होती. मात्र, काही संघांच्या अधिकाऱ्यांना येण्यास विलंब झाल्याने बैठक उशिराने सुरू झाली. या बैठकीत आगामी हंगामाच्या दृष्टीने विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. लाळेवरील बंदी उठविण्याचा प्रस्ताव 'बीसीसीआय'कडून ठेवण्यात आला आणि त्याला बहुतांश कर्णधारांनी पाठिंबा दर्शविला. आता 'बीसीसीआय'च्या या निर्णयामुळे 'आयसीसी'लाही आपल्या नियमाबाबत पुनर्विचार करावा लागू शकतो.

### चेंडू रिव्हर्स स्विंग होण्यास मदत – सिराज

काही दिवसांपूर्वीच झालेल्या चॅम्पियन्स करंडक स्पर्धेदरम्यान भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने लाळेच्या वापरावर असलेल्या बंदीबाबत नाराजी व्यक्त केली होती. "चेंडू रिव्हर्स स्विंग करायचा झाल्यास लाळेचा वापर खूप महत्त्वाचा ठरतो. त्यानेच चेंडूला लकाकी आणता येते. गोलंदाजाला मदत असल्याच खेळाची मजाही वाढते," असे शमी म्हणाला होता. त्याला व्हरनॉन फिलँडर आणि टीम साऊदी यांनी पाठिंबा दर्शविला होता. त्यानंतर या मागणीने जोर धरला आणि 'बीसीसीआय'ने गोलंदाजांचे मत विचारात घेऊन मोठा निर्णय घेतला.भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने गुरुवारी 'आयपीएल'च्या आगामी हंगामात लाळेचा वापर करण्यास परवानगी देण्याच्या 'बीसीसीआय'च्या निर्णयाचे स्वागत केले. यामुळे गोलंदाजांना चेंडू रिव्हर्स स्विंग करण्यास मदत मिळेल, असे सिराजला वाटते. " ही गोलंदाजांसाठी आनंदाची बातमी आहे. जेव्हा चेंडूमधून कुठल्याही पद्धतीची मदत मिळत नाही, तेव्हा लाळेचा वापर करून चेंडू रिव्हर्स स्विंग होण्याची शक्यता वाढते. लाळेचा वापर केल्याने चेंडूच्या एका पृष्ठभागाला चकाकी आणण्यासाठी मदत मिळते. हे स्विव्हर्स स्विंगकरिता गरजेचे असते," असे सिराजने सांगितले. कर्णधारांच्या बैठकीत 'आयपीएल'मध्ये वापरण्यात येणाऱ्या प्रभावी खेळाडू अर्थात 'इम्पॅक्ट प्लेयर' नियमाबाबतही चर्चा करण्यात आली.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार ।
। दि. 22 मार्च 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## शिक्षण विश्व: केवळ नोकरी पुरते मर्यादित न राहता

# नोकरी देणारे व्हा - डॉ. धनंजय वर्णेकर

### चिखलीतील आयआयबीएम कॉलेजमध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठे फूड फेस्टिवल

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**




**कोणतीही गोष्ट शिकताना त्यामध्ये वेगळेपणाची रुची ठेवणे गरजेचे आहे. केवळ नोकरी पुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी नोकरी देणारे झाले पाहिजे असे आवाहन आयआयबीएम संस्थेचे अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर यांनी केले.**

चिखलीतील आयआयबीएम कॉलेजमध्ये नुकताच फूड फेस्टिवल साजरा करण्यात आला. सध्या एव्हिएशन इंडस्ट्री मोठ्या प्रमाणावर विकसित होत आहे, या दृष्टिकोनातून यावर्षी 'इन्फीलाईट फ्लेवर' या थीमवर फूड फेस्टिवल चे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. अरविंद बी. तेलंग इंस्टीट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट प्राचार्य डॉ. अजयकुमार राय, पोलीस निरीक्षक दीपक साळुंखे, आयआयबीएम संस्थेचे अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर, शितल वर्णेकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित प्राचार्य प्रदीप फुलकर, विभागप्रमुख अमोल भागवत, विभागप्रमुख अनिकेत वंजारी, प्रशासकीय प्रमुख प्रतिक्षा डफळ, माजी नगरसेवक संतोष मोरे तसेच कॉलेजचे विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये विविध जिल्ह्यातील विद्यालय, कॉलेज मधील 100 हून अधिक प्राचार्य यांचा गौरव सत्कार समारंभ तसेच 20 हून अधिक पंचतारांकित हॉटेल व्यवस्थापकांना गौरविण्यात आले. आय आय बी एम कॉलेजमध्ये हॉटेल मॅनेजमेंट, एअरपोर्ट मॅनेजमेंट, बिझनेस मॅनेजमेंट, क्रुझ मॅनेजमेंट असे शिक्षण दिले जात असून अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणजेच हा फूड फेस्टिवल. विद्यार्थ्यांना बिझनेस कसा करावा, बिझनेस करताना इन्व्हेस्टमेंट, विक्री, नफा, तोटा या गोष्टीचा अनुभव यावा, यासाठी विद्यार्थ्यांच्या उद्योजकता विकासासाठी 25 पेक्षा अधिक भारतीय तसेच विदेशामध्ये सुप्रसिद्ध असलेले खाद्यपदार्थ स्वतः बनवून प्रमुख पाहुणे तसेच विद्यार्थ्यांचे पालक यांच्यासाठी स्टॉलवर विक्रीस ठेवण्यात आले. तसेच कार्यक्रमांमध्ये मनोरंजन, नृत्य, लाइट्स, डीजे व प्रमुख पाहुणे, प्राचार्य, हॉटेलचे अधिकारी, विद्यार्थी सर्वांची जेवनाचीही सुविधा याचेही आयोजन असल्यामुळे कार्यक्रमाला रंगत आली.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना संस्थेचे अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर यांनी संस्थेच्या 18 वर्षातील प्रगतीचा व कार्याचा आढावा घेतला. तसेच ते म्हणाले विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन व्यापक असला पाहिजे. कोणतीही गोष्ट शिकताना त्यामध्ये वेगळेपणाची रुची ठेवणे गरजेचे आहे. केवळ नोकरी पुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी नोकरी देणारे झाले पाहिजे असे आवाहन देखील वर्णेकर यांनी यावेळी केले.

> हॉटेल व्यवस्थापन, हवाई क्षेत्र, पर्यटन क्षेत्र यामध्ये मोठमोठ्या पदावर आज आयआयबीएमचे विद्यार्थी विद्यार्थिनी काम करत आहेत. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या प्रत्येक संधीचा फायदा घेऊन आई-वडिलांचे नाव उज्वल करावे.\
> **–डॉ.धनंजय वर्णेकर,** अध्यक्ष, आयआयबीएम चिखली.

डॉ. अजयकुमार राय यांनी हॉटेल व पर्यटन व्यवस्थापनाचे करियरसाठी असणारे महत्त्व अधोरेखित करून संस्थेचे व कार्यक्रमाचे खूप कौतुक केले. विभागप्रमुख अमोल भागवत यांनी महाराष्ट्रामधून वेगवेगळ्या ग्रामीण भागातून विद्यार्थी आजआयबीएम संस्थेमध्ये मॅनेजमेंट अभ्यासक्रमासाठी येत आहेत, आजतागायात भरपूर विद्यार्थी परदेशामध्ये स्वतःच्या पायावर उभे आहेत व पुढेही मोठ्या संख्येने विद्यार्थी घडवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे सांगितले.

---

# प्लास्टिकमुक्त पिंपरी चिंचवडसाठी प्रशासन सज्ज!

### प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांवर पाच ते पंचवीस हजारांची दंडात्मक कारवाई

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने पिंपरी चिंचवड शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती सुरू केली आहे. प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करण्याचे आवाहन महानगरपालिकेकडून सातत्याने करण्यात येत आहे. मात्र, त्यानंतरही प्लास्टिक पिशव्यांचा वापर केल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.**

प्लास्टिकमुक्त पिंपरी चिंचवड मोहिमेचा भाग म्हणून आरोग्य विभाग "ह" क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक ३१ मधील नवी सांगवी येथील साई चौक भाजीमार्केट येथे प्लास्टिक बंदी जनजागृती उपक्रम घेण्यात आला. तसेच 'ड' क्षेत्रीय कार्यालय येथील प्रभाग क्रमांक २९ मधील लक्ष्मीनगर येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य



विभागाकडून उपस्थित नागरिकांना झिरो प्लास्टिक, प्लास्टिक फ्री झोन, सिंगल युज प्लास्टिक, प्लास्टिकचे पर्यावरण व मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम, याबाबत माहिती देण्यात आली. त्याचबरोबर प्लास्टिक पिशवीचा वापर टाळून कापडी पिशवीचा वापर करावा, असे आवाहन देखील यावेळी करण्यात आले याशिवाय प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

**पथनाट्य सादरीकरण**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून कचरामुक्त, प्लास्टिकमुक्त शहरासाठी विविध ठिकाणी पथनाट्यांचे सादरीकरण देखील करण्यात येत आहे. या पथनाट्याच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छतेबाबत तसेच कचऱ्याच्या वर्गीकरणाबाबत माहिती दिली .

## अशी आहे दंडाची तरतूद

बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर पहिल्यांदा केल्यास - ५,००० रुपये
बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर दुसऱ्यावेळी केल्यास - १०,००० रु.
बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर तिसऱ्या वेळी केल्यास - २५,००० रुपये व ३ महिने करावास.

> सरकारने प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घातली आहे. प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणे, हा कायदेशीर गुन्हा आहे. त्यामुळे बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्या विक्रेत्याबरोबरच ग्राहकांवर दंडात्मक कारवाई बरोबरच कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद आहे. त्यामुळे नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर करू नये. आपले शहर प्लास्टिकमुक्त होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.
> **–विजयकुमार खोराटे,** अतिरिक आयुक्त


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN
for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School
& Junior College, Moshi
www.gayatrischoolpune.com
95277 64646 / 77967 67292


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा ₹ १३००/-
'C++' भाषा ₹ १३००/-
बेसिक जावा ₹ १३००/-
स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/-
बेसिक टॅली ₹ १५००/-
एम.एस. ऑफिस ₹ १५००/-
कोरल ड्रॉ ₹ ११००/-
Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100


EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org